१६ आदिवासी जिल्हयातील जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांना कार्यक्षेत्रातील फिरतीसाठी वाहन खरेदीकरीता प्रशासकीय मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः वाहन-२०१६/प्र.क्र.७६/आरोग्य-४
मंत्रालय, १० वा मजला, संकूल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.
तारीख: ४ जून, २०१८.

वाचा :-

१) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक : भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकः वाहन-२०१६/ प्र.क्र.५१/१६/ विनियम दि.२१.०१.२०१७.
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः वाहन-२०१५/ प्र.क्र.१८०/ आरोग्य-४, दि.२७.०३.२०१७.
४) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४, दि.२४.०८.२०१७.
५) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र, क्रमांकः संआसे / कक्ष १५ / टे.क्र.१ / गाभा समिती ८ वी सभा / इतिवृत्त मु. क्र. १४, १६, १८ / वाहन खरेदी प्रस्ताव / मान्यता / न. क्र. ६७५-७६ / १७, दि.२७.०३.२०१७.

प्रस्तावना :-

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील गाभा समितीने केलेल्या शिफारशीनुसार १६ आदिवासी जिल्हातील बालमृत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी १६ आदिवासी जिल्हयातील जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांना कार्यक्षेत्रातील फिरतीसाठी वाहने आवश्यक असल्याने आवश्यक खरेदी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.याबाबत पुढील पुमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

राज्यातील १६ आदिवासी जिल्हातील बालमृत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्हा शल्य चिकित्सक यांना कार्यक्षेत्रातील फिरतीसाठी आदिवासी विकास विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या निधी मधून पुढील वाहने खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

अ. क्र.	वाहन उत्पादक कंपनी मॉडेल	इंधन	प्रति नग किमत रु. (As per proforma Invoice)	खरेदी करावयाचे वाहनांची संख्या	प्रस्तावित खरेदीसाठी आवश्यक एकूण रक्कम रु.
१	M/S TATA Motors Ltd. TATA Sumo Gold CX PS Ambulance (BS-IV)	डिझेल	५,७६,८५५/-	१७३ नग	९,९७,९५,९१५/-
२	M/S Maruti India Ltd. Maruti Ertiga LXi (BS-IV) Jeep (Utility Vehicle)	पेट्रोल	५,७०,१६८/-	१८ नग	१,०२,६३,०२४/-
३	1)M/S Force Moters Ltd. Force Traveller Ambulance 9-D 3350 MMWB AC PS (BS-III)	डिझेल	११,३२,७०३/-	२४ नग	२,७१,८४,८७२/-
	2)Fabrication for Neo Natal Ambulance		५,००,०००/-		१,२०,००,०००/-
	3)Medical Equipments & Instruments Neo Natal Ambulance		५,००,०००/-		१,२०,००,०००/-
	एकूण			२१५ नग	१६,१२,४३,८११/-

उपरोक्त वाहनांची खरेदीस खालील अटी व शर्तीच्या अधीन करण्यात यावी :-

१) सदर खरेदी उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४, दि.२४.०८.२०१७ नुसार केंद्र शासनाच्या गव्हर्नमेंट ई मार्केटप्लेस या वेब पोर्टलची कार्यपध्दतीनुसार करण्यात यावी.

२) सदर वाहनांची खरेदी करताना किंमतीचा वाजवीपणा, विनिर्देश इत्यादी संबधीत बाबींची पडताळणी करावी, तसेच, शासकीय निधीत बचत होण्याच्या दृष्टीने खरेदी करतांना उत्पादकांशी किंमतीबाबत वाटाघाटी करुन संबंधीत वाहनांचा न्यूनतम दर करुन घ्यावा.

३) सदर खरेदी करण्यापूर्वी पुरवठादारांकडून वाहने व सेवांची गुवणत्ता, विनिर्देश आणि पुरवठा कालावधी इ. आवश्यक बाबी तपासून, GeM portal वरुन E-bidding किंवा रिव्हर्स ॲक्शन पध्दतीने खरेदी करण्यात यावी.

४) सदर खरेदी उद्योग, उर्जा व कामगार विभागच्या शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६ मधील परिच्छेद २.४ मधील तरतूदीनुसार करण्यात यावी.

५) खरेदी आदेश देण्यापूर्वी प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या अध्यक्षतेखालील खरेदी समितीची मान्यता घेण्यात यावी.

२. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने आदिवासी विकास विभागाने निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर याबाबतचा खर्च, “मागणी क्रमांक आर-३, ४२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली

खर्च, ०१-नागरी आरोग्य सेवा, (०१) (०४)-मुफसल क्षेत्रातील शासकीय रुग्णालये व दवाखाने (४२१० ११०१), ५१-मोटार वाहने" निधी वितरणाबाबतचे आदेश आदिवासी विभागाकडून निधी उपलब्ध झाल्यानंतर स्वतंत्रपणे काढण्यात येतील.

३. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या क्रमांक : वाहन-२०१६/प्र.क्र.५१/१६/विनियम, दि.२१.०१.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदरचा शासन निर्णय, आदिवासी विकास विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२४३/का-६, दि.२१.१२.२०१६ व उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.६/उ-४, दि.१९.०१.२०१८ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०६०११००३२८३४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2018.06.04 13:18:13 +05'30'

प्र. मो. बलकवडे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) व (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१,मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
३. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई.
४. सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), पुणे.
५. सहाय्यक संचालक (लेखा व लेखापरिक्षा), आरोग्य सेवा, पुणे.
६. उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे.
७. वित्त विभाग (विनियम कार्यासन), मंत्रालय, मुंबई.
८. अवर सचिव (अर्थसंकल्प/ लेखा), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
९. निवडनस्ती(आरोग्य-४), सा.आ.वि.